# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं.

**दिनांक:20.08.2026** **वारःगुरुवार**

1. केंद्रीय मंत्रिमंडळाच्या बैठकीत 13 हजार 41 कोटी रुपये खर्चाच्या पाच प्रकल्पांना मंजुरी,
2. भारत-सिंगापूर मंत्रीस्तरीय गोलमेज परिषदेची चौथी फेरी आज सिंगापूरमध्ये,
3. रशियातील मॉस्कोमध्ये आजपासून चार दिवसीय 'इंडिया डे' महोत्सवाला सुरुवात,
4. 35 वर्षांच्या प्रदीर्घ कालावधीनंतर बांगलादेशात आज राष्ट्रपतीपदासाठी निवडणूक आणि,
5. एफ.आय.एच. हॉकी विश्वचषकात भारतीय पुरुष हॉकी संघाचा पाकिस्तानवर विजय.

**केंद्रीय मंत्रीमंडळ**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखाली काल झालेल्या केंद्रीय मंत्रिमंडळाच्या बैठकीत 13 हजार 41 कोटी रुपये खर्चाच्या पाच प्रकल्पांना मंजुरी दिली. यामध्ये चार रेल्वे प्रकल्प आणि एका महामार्ग प्रकल्पाचा समावेश आहे. नवी दिल्लीत काल झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीनंतर केंद्रीय माहिती आणि प्रसारण मंत्री अश्विनी वैष्णव यांनी प्रसारमाध्यमांना याबाबत माहिती दिली.

पश्चिम बंगाल, ओडिशा, तामिळनाडू आणि आंध्रप्रदेश या राज्यांमधील आठ जिल्ह्यांमध्ये रेल्वेचे चार 'मल्टी-ट्रॅकिंग' अर्थात अतिरिक्त मार्गिका प्रकल्प राबवले जातील. 9 हजार 450 कोटी रुपये अंदाजित खर्च असलेले हे प्रकल्प 2030-31 पर्यंत पूर्ण करण्याच नियोजंन करण्यात आल आहे.

केंद्रीय मंत्रिमंडळाने बिहारमधील राष्ट्रीय महामार्ग-22 च्या मुझफ्फरपूर-सीतामढी-सोनबरसा या विभागाचे चार-पदरी मार्गात श्रेणीसुधारणा करण्यासही मंजुरी दिली आहे.

**गोलमेज परिषद**

भारत-सिंगापूर मंत्रीस्तरीय गोलमेज परिषदेची चौथी फेरी आज सिंगापूरमध्ये होत आहे. यामध्ये भारताच्या वतीने अर्थमंत्री निर्मला सीतारामन, परराष्ट्र व्यवहार मंत्री डॉ. एस. जयशंकर, वाणिज्य आणि उद्योग मंत्री पीयूष गोयल तसेच वाणिज्य, उद्योग, इलेक्ट्रॉनिक्स आणि माहिती तंत्रज्ञान राज्यमंत्री जितिन प्रसाद हे मंत्री सहभागी होत आहेत. आय एस एम आर ही यंत्रणा नवीन आणि उदयोन्मुख क्षेत्रांसह विविध क्षेत्रांमधील सहकार्य वाढवण्यासाठी एक महत्त्वाचे व्यासपीठ आहे. याची पहिली बैठक सप्टेंबर 2022 मध्ये नवी दिल्लीत, त्यानंतर दुसरी बैठक ऑगस्ट 2024 मध्ये सिंगापूरमध्ये आणि तिसरी बैठक ऑगस्ट 2025 मध्ये नवी दिल्लीत झाली. या बैठकांमध्ये प्रगत उत्पादन, संपर्क व्यवस्था, डिजिटलायझेशन, आरोग्यसेवा आणि वैद्यकीय क्षेत्र, कौशल्य विकास आणि शाश्वतता यांवरील चर्चांतून 'भारत-सिंगापूर सर्वसमावेशक धोरणात्मक भागीदारी'चा आराखडा तयार करण्यात आला असून त्याच प्रकाशन गेल्या वर्षी सप्टेंबरमध्ये सिंगापूरचे पंतप्रधान लॉरेन्स वोंग यांच्या भारत भेटीदरम्यान करण्यात आल होत.

दरम्यान, परराष्ट्र व्यवहारमंत्री डॉ. एस जयशंकर यांनी काल सिंगापूरचे परराष्ट्र मंत्री व्हिव्हियन बालकृष्णन यांची सिंगपूरमध्ये भेट घेतली. या भेटीदरम्यान, दोन्ही देशांमधील सर्वसमावेशक धोरणात्मक भागीदारी अधिक दृढ करण्याबाबत या नेत्यांनी सविस्तर चर्चा केली. त्यानंतर, डॉ. जयशंकर यांनी बालकृष्णन यांच्यासोबत सिंगापूरमधील भारतीय उच्चायुक्तालयाच्या नवीन कार्यालयीन इमारतीची पायाभरणी केली.

**संरक्षणमंत्री-राजनाथ सिंह**

संरक्षण मंत्री राजनाथ सिंह आज नवी दिल्लीत जपानचे संरक्षणमंत्री शिंजिरो कोइझुमी यांच्याशी द्विपक्षीय चर्चा करणार आहेत. दोन्ही मंत्री सागरी सुरक्षा क्षेत्रातील सखोल सहकार्य तसेच 'मेक-इन-इंडिया' अंतर्गत संरक्षण उपकरणे आणि तंत्रज्ञानाच्या बाबतीत अधिक सहकार्य वाढवण्याबाबत विचार-विनिमय करतील.

दरम्यान, जपानचे संरक्षण मंत्री शिंजिरो कोइझुमी पहिल्यांदाच भारताच्या दौऱ्यावर आले असून त्यांनी काल मुंबईतील 'वेस्टर्न नेव्हल कमांड'ला भेट दिली. यावेळी त्यांनी नौदल प्रमुख ॲडमिरल कृष्णा स्वामीनाथन आणि वेस्टर्न नेव्हल कमांडचे 'फ्लॅग ऑफिसर कमांडिंग-इन-चीफ' व्हाईस ॲडमिरल संजय वात्स्यायन यांच्याशी चर्चा केली.

**अमित शहा**

तामिळनाडूत चेन्नई जवळ महाबलीपुरम  इथ आज केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्या अध्यक्षतेखाली 31 वी दक्षिणी क्षेत्रीय परिषद होत आहे. यामध्ये तामिळनाडू, आंध्र प्रदेश, कर्नाटक, केरळ आदि राज्यांचे मुख्यमंत्री, दोन वरिष्ठ मंत्री तसच पुददूचेरी, अंदमान, निकोबर, लक्षद्वीपसमूह या केंद्रशासित प्रदेशाचे उपराज्यपाल आणि प्रशासकीय अधिकारी सहभागी होत आहेत. यामध्ये मुख्यतः दक्षिणे कडील राज्यांमधील अंतर्गत सीमा वाद, कावेरीपाणी वाटप प्रश्न आदि विविध महत्वाच्या प्रश्नांवर चर्चा होण्याची अपेक्षा आहे. या राज्यांमधील परस्पर सहकार्य वाढवण्याच्या दृष्टीने तसच केंद्रसरकारशी अधिक समन्वय राखण्याच्या दृष्टीने महत्वपूर्ण बाबींवरही यावेळी विचार विनिमय करण्यात येणार आहे .

**'इंडिया-डे' महोत्सव**

रशियातील मॉस्कोमध्ये आजपासून चार दिवसीय 'इंडिया डे' महोत्सवाला सुरुवात होत आहे. हा महोत्सव संस्कृती, परंपरा आणि दोन्ही देशातील नागरिकांमधील संबंधांचा उत्सव असून तो मॉस्कोमधील 'गोस्तिनी द्वोर' इथ आयोजित करण्यात आला आहे. "संस्कृतींची एकता-लोकांची मैत्री" या संकल्पनेवर आधारित या महोत्सवात विविध ठिकाणी अनेकविध कार्यक्रम सादर केले जातील. सुमारे 20 विशेष विभागांद्वारे योग, बुद्धिबळ, भारतीय विवाहसोहळे, नृत्य आणि आयुर्वेद यांसारख्या भारतीय संस्कृतीच्या विविध पैलूंचा अनुभव घेण्याची संधी नागरिकांना मिळेल. या महोत्सवात रशियातील सुमारे 75 योग संस्था आणि इतर देशांतील प्रशिक्षक सहभागी होतील. तसेच, भारतीय नृत्याची विविधता आणि कलात्मक परंपरा दर्शविणाऱ्या सादरीकरणांमध्ये 200 हून अधिक भारतीय आणि रशियन नर्तक सहभागी होतील. याव्यतिरिक्त उत्सवात सहभागी होणाऱ्या नागरिकांना पाककलेचे प्रात्यक्षिक वर्ग आणि अस्सल भारतीय पदार्थ, रेस्टॉरंट्स यांच्या माध्यमातून भारतीय खाद्यसंस्कृतीचा अनुभव घेण्याची संधी मिळेल.

**राष्ट्रपती निवडणूक**

35 वर्षांच्या प्रदीर्घ कालावधीनंतर बांगलादेशात आज राष्ट्रपतीपदासाठी निवडणूक होत आहे. यात सत्ताधारी बीएनपीचे  ज्येष्ठ नेते मिर्झा फखरुल इस्लाम आलमगीर आणि 11-पक्षीय विरोधी आघाडीचे उमेदवार कर्नल ओली अहमद यांच्यात ही लढत होत आहे. राष्ट्राध्यक्षपदाच्या निवडणुकीसाठी संसदेच्या इमारतीत आज दुपारी 2 ते सायंकाळी 5 या वेळेत हे मतदान पार पडेल.

निवडून आलेले नवीन राष्ट्राध्यक्ष उद्या सायंकाळी 'बंगभवन'च्या दरबार हॉलमध्ये बांगलादेशचे राष्ट्राध्यक्ष म्हणून शपथ घेतील.

पदच्युत पंतप्रधान शेख हसीना यांचे निकटवर्तीय मोहम्मद शहाबुद्दीन यांनी आपला पाच वर्षांचा कार्यकाळ पूर्ण करण्यापूर्वीच, गेल्या महिन्यात प्रकृती अस्वास्थ्यामुळे राजीनामा दिल्याने ही राष्ट्राध्यक्षपदाची निवडणूक होत आहे.

**युवा संगम**

युवा संगमच्या सातव्या टप्प्यातील नोंदणीसाठीची अंतिम मुदत या महिन्याच्या 31 तारखेपर्यंत वाढवण्यात आली असल्याचं शिक्षण मंत्रालयानं कळवलं आहे. 18 ते 30 वयोगटातील तरुण, उच्च शिक्षण संस्था, NSS स्वयंसेवक आणि युवा व्यावसायिक हे अधिकृत युवा संगम पोर्टलद्वारे नोंदणी करू शकतात. युवा संगम मध्ये निवडले गेलेले विद्यार्थी विविध राज्य आणि केंद्रशासित प्रदेशांचा 5 ते 7 दिवसांच्या शैक्षणिक आणि सांस्कृतिक दौरा करतील.

**क्रिकेट**

श्रीलंकेविरुद्धच्या कसोटी क्रिकेट सामन्यांच्या मालिकेतला पहिला सामना भारतानं 165 धावांनी जिंकला. भारतानं श्रीलंकेच्या संघासमोर विजयासाठी 372 धावांचं लक्ष्य ठेवलं होतं मात्र श्रीलंकेचे सर्व फलंदाज 206 धावातच बाद झाले. मानव सुतारनं श्रीलंकेचे सहा गडी बाद केल

**हॉकी विश्वचषक**

एफ आय एच हॉकी विश्वचषकात भारतीय पुरुष हॉकी संघानं काल झालेल्या सामन्यात पाकिस्तानचा 5-3 असा पराभव करत पुढील फेरीत प्रवेश केला आहे. हरमनप्रीत सिंग आणि हार्दिक सिंग यांनी प्रत्येकी दोन गोल केले, तर अभिषेकने एक गोल केला. भारतीय महिला हॉकी संघ अंतिम ड गटात आज इंग्लंडशी सामना करणार आहे. मंगळवारी भारतानं दक्षिण आफ्रिकेविरुद्ध 6-1 असा विक्रमी विजय मिळवल्यानंतर आता महिला संघ आत्मविश्वासानं पुढील फेरीसाठी सज्ज झाला आहे.

# या बरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपल.

# नमस्कार.